# <u>निशाणी ३८ वरील आदेश</u>

(नारायण पायनाईक वि.अरुणा भेरे व.)

<u>CNR.No.MHSI06-000155-2022</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करणेत आलेला असून, त्यायोगे वादीने प्रतिवादी क्र. १ व ४ यांचेविरुध्द निशाणी क्र. २९ लगत पारीत केलेला 'जैसे थे परिस्थिती ' ठेवणेबाबतचा आदेश पुढील तारखेपर्यंत कायम करणेबाबत विनंती केलेली आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १ व ४ यांचे वतीने म्हणणे दाखल करणेत आलेले आहे. प्रतिवादी क्र. १ यांचे मते, प्रतिवादी क्र. १ ही ७३ वर्षाची वृध्द असून जैसे थे आदेशामुळे ती दुरुस्ती करीत असलेल्या इमल्यामुळे छप्पर नसलेमुळे वास्तव्य करणे अडचणीचे आहे. अवकाळी पाउस पडत असलेमुळे सदर मिळकतीचे नुकसान होत आहे. सदर दुरुस्तीचे काम पूर्ण न झालेस तिचे पैशाचे स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. वादीने दाव्यामध्ये इमला क्र. ५२० ही दावा मिळकत समाविष्ट केलेली नसलेमुळे वादीस अशा प्रकारची दाद मागता येणार नाही. या कारणाकरीता सदर अर्ज नामंजूर होणे जरुरीचे आहे.

३. प्रतिवादी क्र. ४ यांचे मते, ते बांधकामाचे मक्तेदार असून इमला क्र. ५२० चे कोणत्याही प्रकारचे बांधकाम करीत नाहीत. ते बांधकाम पूर्ण न झालेस त्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, सदर अर्ज नामंजूर होणे जरुरीचे आहे.

४. वादी, प्रतिवादी क्र. १ व ४ तर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत कामी गेले तारीखेस निशाणी क्र. २९ लगत आदेश पारीत करणेत आलेला असून, त्यायोगे प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी दाव्या मिळकतीमध्ये पुढील नेमले तारीखेपर्यंत कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करणेचे नसून दावा मिळकतीची परिस्थिती जैसे थे ठेवणेची आहे असा आदेश पारीत करणेत आलेला आहे.

**६.** प्रस्तुत कामी आज रोजी प्रतिवादी क्र. २ हे न्यायालयात वकीलांमार्फत हजर झालेले असून प्रतिवादी क्र. १ व २ यांनी आज निशाणी क्र.०५ वरील तूर्तातूर्त मनाई अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. तथापि, प्रतिवादी क्र. ४ यांनी निशाणी क्र. ०५ लगत दाखल असणाऱ्या अर्जास म्हणणे दाखल करणेस मुदत मिळणेकरीता मुदत अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज शेवटची संधी म्हणून मंजूर करणेत आलेला आहे. निशाणी क्र. ०५ लगत दाखल असणारा तूर्तातूर्त मनाई अर्ज हा प्रतिवादी क्र. १, २ व ४ यांचेविरुध्द दाखल केलेला असलेमुळे प्रतिवादी क्र. ४ यांचे म्हणणे सादर केलेखेरीज सदर अर्जाची चौकशी करता येणार नाही. प्रतिवादी क्र. ४ यांचा म्हणणे दाखल करणेस मुदत मिळणेकरीता दाखल करणेत आलेला अर्ज मंजूर करणेत आलेमुळे प्रतिवादी क्र.४ यांनी म्हणणे दाखल होईपर्यंत दावा मिळकतीची आजमितीस असणारी परिस्थिती कायम राहणे आवश्यक आहे. सबब, निशाणी क्र. २९ लगत अस्तित्वात असलेला आदेश पुढील नेमले तारीखेपर्यंत कायम करणे न्यायोचित वाटत आहे. सबब, मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

निशाणी क्र. २९ लगत पारीत करणेत आलेला आदेश पुढील तारीखेपर्यंत कायम करणेत येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DURGA BHAGAWAN SUTAR
Date: 2022.03.22 10:57:48 +0530

( डी.बी.सुतार )

दिनांकः-१७/०३/२०२२.

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.